महाज्योती
ज्ञानदीप सततेया

महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022
दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/2356/2023 दिनांक - 02/11/2023

## महाराष्ट्र अराजपत्रित गट 'ब' मुख्य परीक्षा-2023 साठी अर्थ सहाय्य योजनचे तपशील

महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्ग विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील महाराष्ट्र अराजत्रित गट ब पुर्व परीक्षा-2023 उत्तीर्ण (दि.23/08/2023 व दि.04/09/2023 रोजी MPSC ने जाहीर केलेल्या निकालाप्रमाणे) झालेल्या विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेसाठी एकरकमी अर्थ सहाय्य प्रदान करण्यासाठी अर्थ सहाय्य योजनेकरिता ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

**योजनेचे स्वरुप** :- महाराष्ट्र अराजत्रित गट 'ब' पुर्व परीक्षा-2023 उत्तीर्ण झालेल्या व महाराष्ट्र अराजत्रित गट ब मुख्य परिक्षेसाठी पात्र नॉन क्रिमीलेअर गटातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती - भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना एकरकमी रक्कम रु.10,000/- आर्थिक सहाय्य महाज्योती मार्फत देण्यात येईल.

**योजनेच्या लाभासाठी पात्रता** :-

1. उमेदवार महाराष्ट्रातील रहिवासी असावा.
2. विद्यार्थी नॉन क्रिमीलेअर गटातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती - भटक्या जमाती ती तसेच विशेष मागास प्रवर्गापैकी असावा.
3. विद्यार्थी हा महाराष्ट्र अराजत्रित गट 'ब' पुर्व परीक्षा-2023 उत्तीर्ण झालेला असावा.
4. ज्या उमेदवारांना सदर परीक्षेसाठी इतर संस्था/सारथी, पुणे यांचेकडून अर्थसहाय्य मिळत आहे किंवा त्यासाठी अर्ज केला आहे. अश्या उमेदवारांना सदर योजनेच्या लाभासाठी अर्ज करता येणार नाही.

**अर्ज करण्यासाठी आवश्यक वैयक्तिक कागदपत्रे** :-

1. आधार कार्ड
2. जातीचा प्रमाणपत्र
3. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र
4. पूर्व परीक्षेचे प्रवेश पत्र
5. बॅकेचे तपशील (बॅक पासबुक किंवा रद्द चेक)
6. महाराष्ट्र अराजत्रित गट 'ब' पुर्व परीक्षा-2023 उत्तीर्ण झालेल्या निकालाची प्रत (बैठक क्रमांक ठळक करून देण्यात यावा.)

**अर्ज कसा करावा:-**

1. महाज्योती www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील **Application Invited For Financial Assistance Those Who Qualified For** Maharashtra Non-Gazetted Group B (ASO, PSI, STI) Services - 2023" Main exam यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
2. अर्जासोबत वरील नमूद कागदपत्रे स्वाक्षांकीत करुन स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन अपलोड करावे.

**अटी व शर्ती** :

1. अर्ज करण्याचा अंतिम दि.15/11/2023 आहे.
2. पोस्टाने किंवा ई-मेल व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.
3. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती यांचे राहतील.
4. चालू आर्थिक वर्षात कोणत्याही प्रकारचा एकरकमी लाभ घेतलेला विद्यार्थी या योजनेकरीता पात्र राहणार नाही.
5. महाज्योती मार्फत MBA-CAT/CMAT-CET, UGC-NET-SET, मिलीटरी भरती प्रशिक्षण यापैकी चालु योजनेचा लाभ घेत असलेले विद्यार्थी या योजनेकरीता पात्र राहणार नाही.
6. बँक खाते फक्त अर्जदाराच्या नावाचेच असावे, नातेवाईक/पालक/मित्र यापैकी आढळल्यास विद्यार्थ्यांचे अर्ज महाज्योती, नागपूर मार्फत रद्द करण्यात येईल.
7. अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास केवळ महाज्योतीच्या Call Centre वर पुढील क्रमांकावर संपर्क करावा :
   0712-2870120/21.

   **E-mail Id.**: mahajyotimpsc21@gmail.com

(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर.